जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी सेवेतील उत्कृष्ट अभियंत्यांना सन २०१५-१६ या वर्षाकरिता वैयक्तिक व सांघिक पुरस्कार देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: पुरस्कार-२०१७/(प्र.३९/२०१७)/गो.का
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ११.०९.२०१९

वाचा:- शासन निर्णय,जलसंपदा विभाग, क्र.पुरस्कार-२०१५/ (प्र.२१/२०१५) /गोपनीय कार्यासन, दि.१७ जुलै,२०१५

शासन निर्णय

जलसंपदा विभागातील प्रकल्प किंवा योजना इ. राबविताना अभियंत्यांचे तांत्रिक तसेच प्रशासकीय कौशल्य पणाला लागते. अशा प्रकल्पांचे किंवा योजनांचे काम करताना संबंधित अभियंत्यांचे विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा अभियंत्यांचा राज्याच्या विकासामधील महत्वाचा वाटा व योगदान विचारात घेऊन, त्यांच्या उत्कृष्ट कामाचे कौतुक व्हावे व प्रोत्साहन मिळावे या हेतूने या विभागातील उत्कृष्ट अभियंत्यांना वैयक्तिक प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यासाठी अभियांत्रिकी सेवेतील कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता या संवर्गातील अधिकाऱ्यांना **वैयक्तिक प्रशस्तीपत्र व सांघिक पुरस्कार** देण्याची योजना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सुरु केली आहे.

२. वरील निर्णयाच्या अनुषंगाने सन २०१५-१६ या वर्षात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी करीता उत्कृष्ट अभियंता पुरस्कारासाठी पुढील तक्त्यात नमूद केलेल्या अभियंत्यांची निवड करण्यात आली आहे.

वैयक्तिक पुरस्कार:-

संवर्ग (गटवारी)	**समितीने शिफारस केलेल्या अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यालय**
मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता	श्री. र. रा. शुक्ला, अधीक्षक अभियंता तथा उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यकारी अभियंता (विभागून)	१) श्री. राजेश मुरलीधर मोरे, कार्यकारी अभियंता,सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर
	२) श्री. ज्ञा. आ. बागडे, कार्यकारी अभियंता , कोयना सिंचन विभाग , कोयना नगर
उप अभियंता (विभागून)	१) श्री. श्रीराम विजय हजारे, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव (बांधकाम), बुलढाणा.
	२) श्री. योगेश र. सावंत, सहायक अभियंता श्रेणी १, फ़लटण पाटबंधारे उपविभाग, फलटण.

कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता	१) श्री. बबन सवाईराम राठोड, शाखा अभियंता, लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग क्र.५, रिसोड, वाशिम.
	२) श्रीरंग गोपाळ ठवरे, म्हसवड तलाव शाखा महूद, पंढरपूर उपविभाग, पंढरपूर

३. सदर अभियंत्यांना प्रशस्तीपत्र व गौरव चिन्ह समारंभपुर्वक प्रदान करण्यात येईल. निवड झालेल्या अभियंत्यांच्या सेवापुस्तकात संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी **"प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला"** अशी नोंद घ्यावी व तसे संबंधितांना कळवावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०९१११६३२०६३५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Sajanikar

Digitally signed by Prashant Sajanikar
DN: CN = Prashant Sajanikar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.09.11 16:45:00 +05'30'

(प्रशांत ज. साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२ मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३ मा.मंत्री, जलसंपदा, यांचे खाजगी सचिव.
४ मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
५ मा. विधानसभा/ विधान परिषद विरोधी पक्ष नेता.
६ प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.) / सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि)/ सचिव (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
७ सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य.
८ सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
९ महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१० सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग.
११ सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग.
१२ सर्व पुरस्कार प्राप्त अभियंते (संबंधित प्रादेशिक कार्यालय प्रमुखांमार्फत).
१३ जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने.
१४ गोपनीय कार्यासन संग्रहार्थ.